# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 October 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- न्याय पक्षकाराच्या दारात पोहोचला पाहिजे, सरन्यायाधीशांचं प्रतिपादन
- राज्यातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र
- माहिती अधिकार कायद्याला अधिक बळकट करण्यासाठी काँग्रेस पक्ष आवाज उठवणार, प्रदेशाध्यक्षांची माहिती
- विकसित भारत बिल्डेथॉन राष्ट्रीय स्पर्धा आज, देशभरातल्या शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग

आणि

- दिल्ली क्रिकेट कसोटीत फॉलोऑननंतर तिसऱ्या दिवसअखेर वेस्ट इंडिज अजूनही ९७ धावांनी पिछाडीवर

****

न्याय पक्षकाराच्या, शेवटच्या घटकाच्या दारात पोहोचला पाहिजे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केलं आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगड इथल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचं उद्घाटन काल सरन्यायाधीशांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळे आपला देश एकसंघ आणि प्रगतिपथावर असल्याचं गवई यांनी सांगितलं. ते म्हणाले,

**बाईट – सरन्यायाधीश भूषण गवई**

कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायपालिका हे प्रशासनाचे तिन्ही स्तंभ देशाच्या नागरिकांना न्याय देण्यासाठीच काम करतात, त्यांचं अधिकारक्षेत्र स्वतंत्र असलं, तरी त्यांनी एकमेकांच्या विरोधात काम करू नये, असंही सरन्यायाधीशांनी सांगितलं. गेल्या काही काळात न्यायपालिकेच्या विविध पायाभूत सुविधांच्या विकासात राज्य सरकारची भूमिका मोठी असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

न्यायदानाच्या व्यवस्थेला वेग देण्याचं काम सातत्याने सुरु आहे, न्यायालयं ज्या काही सूचना देतील त्या अवलंबल्या जातील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

महाराष्ट्रातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र मिळालं आहे. या यादीत रायगड जिल्ह्यातल्या श्रीवर्धन आणि नागाव, पालघरमधल्या पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांचा समावेश आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली. जागतिक स्तरावर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक समुद्र किनाऱ्यांना डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून ३३ निकषांच्या मूल्यमापनातून हे मानांकन दिलं जातं. पर्यावरण शिक्षण, पाण्याची गुणवत्ता, सुरक्षा आणि पर्यावरण व्यवस्थापन यांसह सेवा – सुरक्षा या घटकांचा यात समावेश असतो.

****

एनएसजी, अर्थात राष्ट्रीय सुरक्षा रक्षकांच्या २६व्या विशेष तुकडीनं काल मुंबईत २००८ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले मेजर संदीप उन्नीकृष्णन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सायक्लोथॉन आयोजित केली होती. 'एनएसजी' च्या स्थापना दिनाची औपचारिक सुरुवात करून, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणं आणि 'फिट इंडिया' चळवळीला प्रोत्साहन देणं, हे या सायक्लोथॉनचं उद्दिष्ट आहे. एनएसजीच्या या उपक्रमात अडीचशेपेक्षा जास्त व्यावसायिक सायकलस्वार सहभागी झाले होते.

****

माहिती अधिकार कायदा सक्षम बनवण्यासाठी आवाज उठवण्याची गरज असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेस सरकारनं आणलेल्या माहिती अधिकार कायद्याला २० वर्ष पूर्ण झाली, मात्र जनतेला दिलेल्या या महत्वाच्या अधिकाराची धार भाजपा सरकार बोथट करत आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे काँग्रेस पक्ष हा कायदा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचं सपकाळ यांनी सांगितलं.

****

बिहार विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप निश्चित झालं आहे. भारतीय जनता पक्ष आणि संयुक्त जनता दल प्रत्येकी १०१ जागांवर निवडणूक लढवतील, तर लोक जनशक्ती पक्ष रामविलास या पक्षाला २९ जागा दिल्या आहेत. राष्ट्रीय लोक मोर्चा आणि हिंदुस्थानी आवाम मोर्चा हे पक्ष प्रत्येकी ६ जागांवर उमेदवार उतरवणार आहे.

****

विकसित भारत बिल्डेथॉन राष्ट्रीय स्पर्धा आज होणार आहे. देशभरात शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष –रचनात्मकतेला प्रोत्साहन देण्यासह स्वदेशी, आत्म निर्भर भारत, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या संकल्पनांवर आधारित ही अभिनव स्पर्धा आहे. यात लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे देशभरातल्या शाळांमधल्या विद्यार्थांचे संघ आपल्या विशेष प्रकल्पांसह संबंधीत कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीनं सहभागी होतील.

****

डॉक्टर जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राबवण्यासाठी राज्य शासनाने खान अकॅडमीशी सामंजस्य करार केला आहे. याचा लाभ ५० लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना होणार आहे. या कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ मध्ये राज्यातल्या सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध असेल. चित्रफितीचा वापर करून अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हायला मदत होईल.

****

बीड इथल्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला पाच लाख रुपयांची मदत दिली आहे. संस्थेतर्फे हा धनादेश काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

पालघर इथल्या दांडेकर महाविद्यालयातल्या करियर कट्टा विभागाने देखील महाविद्यालयाच्या मदतीने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत मराठवाड्यातल्या पुरग्रस्तांना आर्थिक मदत केली आहे. या महाविद्यालयात “पूरग्रस्त सहायता निधी संकलन मोहीम” राबवण्यात आली. या उपक्रमातून गोळा झालेला निधी मुख्यमंत्री

सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून पुरग्रस्त भागात पाठवण्यात आला. या निधीचा उपयोग मराठवड्यातल्या पूरग्रस्त विद्यार्थाना शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी केलं जाईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

औंध इथल्या वस्तू संग्रहालयाच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने ५२ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. पर्यावरणाचा समतोल राखून, ऐतिहासिक वारसा जपत संग्रहालयाचं नूतनीकरण केलं जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल ८५ व्या औंध संगीत महोत्सवात दिली.

****

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर शहरातल्या बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण दिसून येत आहे. गुलमंडी, पैठणगेट, औरंगपुरासह हडको, वाळूज भागातल्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली आहे.

दिवाळीसाठी परभणी जिल्ह्यातल्या स्कॉटिश अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी हस्तकला आणि कौशल्यातून दिव्यांची निर्मिती आणि सजावट केलेले दिवे तसंच आकाश कंदील तयार केलेल्या वस्तूंचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं.

****

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाने केलेल्या मंदिर स्वच्छता अभियानाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन संपूर्ण मराठवाडा आणि खानदेश मिळून १४ जिल्ह्यातल्या धार्मिक स्थळांची स्वच्छता करण्यात आली. सुमारे दीड हजार कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी झाले होते.

****

जालना जिल्ह्यात काल पोलीस पाटील भरतीसाठी लेखी परीक्षा पार पडली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी विविध परीक्षा केंद्रांना भेट देऊन परीक्षा पारदर्शक व्हावी आणि कोणताही गैरप्रकार होऊ नये याची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्ह्यातल्या ७२४ रिक्त पदांसाठी २४ परीक्षा केंद्रांवर सात हजार ८४३ उमेदवारांनी ही परिक्षा दिली.

****

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडिजचा संघ ९७ धावांनी पिछाडीवर आहे. सामन्याच्या कालच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजच्या संघाला फॉलोऑन मिळाला, दिवस अखेर त्यांच्या

दोन बाद १७३ धावा झाल्या. कुलदीप यादव यानं ८२ धावांत ५ बळी घेत भारताला मोठी आघाडी मिळवून दिली. त्याने केवळ १५ कसोटी सामन्यांत ५ वेळा पाच बळी घेत जागतिक विक्रम रचला आहे. रवींद्र जडेजानं ३ तर मोहम्मद सिराज आणि जसप्रित बुमराह यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले.

****

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत साखळी सामन्यात काल भारतीय संघाचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव झाला. प्रथम फलंदाजी करत भारतीय संघाने ३३० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या संघाने सात खेळाडू गमावत हे लक्ष्य पूर्ण केलं. पदकतालिकेत भारत चार गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

****

मलेशियात जोहोर बहरू इथं सुरू असलेल्या, सुलतान जोहोर कप कनिष्ठ पुरुष हॉकी स्पर्धेत काल भारताने न्यूझीलंडचा ४-२ असा पराभव केला. भारताचा पुढील सामना उद्या मंगळवारी पाकिस्तानविरुद्ध होईल.

****

राज्यात येत्या १५ ते १८ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावं आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावं, असे आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

****